**सुधारित** २८ वैशाख १९२७ (सायं.५.३०वा)

**विशेष लेख क्र.६४** बुधवार, दि. १८ मे, २००५

**ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट करणारे**
**ग्रामस्वच्छता अभियान : महाराष्ट्राला वरदान**

***महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्याच्या विकासासाठी विविध माध्यमांद्वारे प्रयत्न करण्यात आले. महाराष्ट्र राज्य हे सुजलाम, सुफलाम व्हावे यासाठी राज्यात विविध योजना, उपक्रम राबविण्यात आले. आपले राज्य देशात विविध आघाडीवर पहिल्या क्रमांकात येण्यासाठी सर्व घटकांनी प्रयत्न केले.***

***असाच एक प्रयत्न संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामार्फत झाला. पाहता पाहता या अभियानाने मोठे स्वरुप धारण केले आणि ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट सुरु झाला. अवघ्या चार वर्षाच्या कालावधीत जवळपास एक हजार कोटी रुपयांची कामे झाली. दि. १८ मे २००५ रोजी या अभियानांतर्गत २००३-०४ चे राज्यस्तरीय पारितोषिक वितरण संपन्न होत आहे. त्या निमित्त हा लेख.. ..***

राज्यातील ग्रामीण भागात परिसर स्वच्छता वाढीस लागावी आणि वैयक्तिक स्वच्छतेची गोडी निर्माण व्हावी यासाठी शासनाने **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान** सुरु केले. ग्रामीण भागातील जनतेने, त्या भागातील नागरिकांनी आपले गाव सर्वांग सुंदर बनविण्याठी एकत्र येऊन केलेले अभियान, केलेले प्रयत्न आणि त्यातून उभारलेले उत्तम असे गांव.

या गावांची तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरांवरील स्पर्धा, शेवटी राज्यस्तरीय निवड आणि गावांचा, ग्रामस्थांचा मोठा गौरव. अशा प्रकारे हे अभिनव अभियान. आज स्वच्छतेची आवड निर्माण झाल्यानंतर ती सातत्याने टिकविण्याचे प्रयत्न, त्यासाठी ग्रामस्थाची धडपड, शासनाच्या विविध योजना गावात मोठ्या जोशाने अन प्रसंगी ईर्षेने यशस्वी राबविण्यासाठी जीवाचा आटा-पीटा. यात आमच्या भगिनी वर्गाचाही मोठा सहभाग किंबहूना महिला सरपंच असलेल्या ठिकाणी तर तुलनात्मकदृष्ट्या जास्त सहभाग, प्रतिसाद अन उत्साह देखील. . .

सततचा स्पर्धेतील सहभाग, जिंकण्याची आशा, अपयशी ठरल्यास नैराश्यास जवळ न करता परत मोठ्या उमेदीने सुरुवात. विजयी ठरल्यास तो विजय, ते यश टिकविण्यासाठी धडपड आणि या सर्वांतून गावाचे आरोग्य, शिक्षण, ऊर्जा, पाणी यावर नियंत्रण, अशा विविधेतून एकता साधून या ग्रामस्वच्छता अभियानाने मोठी भरारी घेतली आहे.

**विविध उपक्रमांची जोड**

एखादे अभियान यशस्वी होताना दिसले की, त्यास पूरक असे विविध उपक्रम जोडून मोठे यश मिळविण्याचा प्रयत्न होतो. तसेच या अभियानासाठी झाले. निर्मल ग्राम, आमच्या गावात आम्ही सरकार या सारखी सार्वजनिक हिताचे व सहभागाचे अभियान यास जोडण्यात आले आणि एक सक्षम असे मोठे अभियान सुरु झाले.

..२..

स्वच्छतेच्या बाबतीत निगडीत अकरा बाबीवर या अभियानात भर देण्यात आला आणि जनजागृती करण्यात आली. २ ऑक्टोबर २००३ या गांधी जयंतीच्या दिवशी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेतल्या आणि ३१ ऑक्टोबर २००३ रोजी आपले ग्राम सातत्याने स्वच्छ ठेवण्याच्या निर्णय व्यक्त करण्यासाठी **संकल्प दिवस** साजरा केला. तेव्हापासून हे अभियान एखाद्या अखंड ज्योतीप्रमाणे मागदर्शक म्हणून अविरतपणे राबविले जात आहे.

राज्यात स्वच्छतेची संस्कृती निर्माण व्हावी म्हणून **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा** व प्रत्येक जिल्ह्यांतून जास्त सहभाग मिळण्यासाठी **राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती व जिल्हा परिषद स्पर्धा** सुरु झाली. आतापर्यंतची आकडेवारी पाहता राज्यात या अभियानामुळे ग्रामीण भागाचा कायापालट करणारी जवळपास एक हजार कोटी रुपयांची विविध कामे झाली आहेत.

## यंदाचे विजेते

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत राज्यस्तरीय समितीने सखोल तपासणी करुन सन २००३-०४ चे राज्यस्तरीय पारितोषिक देण्यासाठी पुढील ग्रामपंचायतींची शिफारस केली आहे. तसेच या अभियानांतर्गत असलेल्या विशेष पारितोषिकांसाठीही काही ग्रामपंचायतींची शिफारस केली आहे. त्याची नावे पुढीलप्रमाणे आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा

प्रथम पारितोषिक रुपये २५ लाख, ग्रामपंचायत कवठेपिराण, ता.मिरज, जि.सांगली; द्वितीय पारितोषिक रुपये १५ लाख, विभागून प्रत्येकी रुपये ७.५० लाख, ग्रामपंचायत किकवारी खुर्द, ता.बागलाण, जि.नाशिक, ग्रामपंचायत वडगाव आमली, ता.पारनेर, जि.अहमदनगर; तृतीय पारितोषिक रुपये १२.५० लाख विभागून प्रत्येकी रुपये ६.२५ लाख, ग्रामपंचायत जैन्याळ, ता.कागल, जि.कोल्हापूर, ग्रामपंचायत चोरखमारा, ता.तिरोडा, जि.गोंदिया.

## ग्रामअभियानांतर्गत विशेष पारितोषिके

पाणी व सांडपाणी व्यवस्थापन या कार्यक्रमातील उत्कृष्ट कार्याबद्दल रुपये ३ लाखाचा वसंतराव नाईक स्मृती पुरस्कार ग्रामपंचायत शेळगांव गौरी, ता. नायगांव जि. नांदेड; कुटुंब कल्याण कार्यक्रमातील उत्कृष्ट कार्याबद्दल रुपये ३ लाखाचा आबासाहेब खेडकर स्मृती पुरस्कार, ग्रामपंचायत नशिरपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती, सामाजिक एकता या कार्यक्रमातील उत्कृष्ठ कार्याबद्दल रुपये ३ लाखाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार ग्रामपंचायत महाळुंगे,ता.भिवडी, जि.ठाणे

## पत्रकारांसाठी पुरस्कार

तसेच अभियानाची व्याप्ती वाढावी व अभियानास भरघोस प्रतिसाद लाभावा यादृष्टीने प्रसार व प्रसिद्धीचे काम करणाऱ्या गुणानुक्रमे ३ उत्कृष्ट पत्रकारांना यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार

प्रथम क्रमांक रुपये २५ हजार - हरीश पाटणे, दै.पुढारी, सातारा; द्वितीय क्रमांक रुपये १५ हजार - दिलीपकुमार चिंचकर, दै.सकाळ, सातारा; तृतीय क्रमांक रुपये १० हजार - सिकंदर जमाल, दै.तरुण भारत, कोल्हापूर.

तसेच या समितीने **राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषदा व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेअंतर्गत,** राज्यातील स्वच्छ जिल्हा परिषदा व स्वच्छ पंचायत समित्यांसाठी असलेल्या पारितोषिकांसाठी खालील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची निवड केली.

..३/-

**राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद स्पर्धा**

प्रथम पारितोषिक रुपये १५ लाख - जिल्हा परिषद, उस्मानाबाद; द्वितीय पारितोषिक रुपये १० लाख - जिल्हा परिषद, वर्धा; तृतीय पारितोषिक रुपये ५ लाख - जिल्हा परिषद, भंडारा.

**पुणे-नागपूरचे यश**

सन २००३-०४ या वर्षात उस्मानाबाद, वर्धा व भंडारा जिल्हा परिषदेस अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात येत असले तरी, या स्पर्धेत गुणानुक्रमे प्रथम व दुसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे पुणे व नागपूर या जिल्हा परिषदा आहेत. परंतु, या स्पर्धेअंतर्गत सन २००१-०२ मध्ये पुणे जिल्हा परिषदेस प्रथम व सन २००२-०३ मध्ये नागपूर जिल्हा परिषदेस द्वितीय पातितोषिक प्राप्त झाले असल्याने, स्पर्धेच्या नियमानुसार त्यांचा या वर्षी पारितोषिकासाठी विचार करता आला नाही. या जिल्हा परिषदांनी अभियानात आपली सातत्यपूर्ण कामगिरी ठेवली असल्याने या जिल्हा परिषदांचा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येत आहे.

**राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती स्पर्धा**

प्रथम पारितोषिक रुपये ७.५० लाख - पंचायत समिती, भोर जि.पुणे; द्वितीय पारितोषिक रुपये ५ लाख - पंचायत समिती, शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर; तृतीय पारितोषिक रुपये २.५० लाख - पंचायत समिती, चंदगड, जि.कोल्हापूर.

**स्वच्छता दूत**

तसेच, ज्या व्यक्तींनी स्वच्छतेच्या कार्यक्षेत्रात सातत्यपूर्ण व भरीव कामगिरी केली आहे त्याची दखल घेऊन अशा व्यक्तींचा **स्वच्छता दूत** या उपाधिसह प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येत आहे. यात बी.सी.खटुआ, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट राज्य; चंद्रकांत दळवी, खाजगी सचिव, उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय; डॉ.एस.व्हि.मापूसकर, संचालक, अप्पा पटवर्धन सफाई व पर्यावरण तंत्रनिकेतन, देहूगांव यांचा समावेश आहे.

-- राजू पाटोदकर,
विभागीय संपर्क अधिकारी

०००